नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०४/२०२५ (बुधवार)**

---

## अवैधरीत्या गांजा (अंमली पदार्थ) ची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द कारवाई ,२ किलो गांजा जप्त, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :– दिनांक २३/०४/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फतीने खबर मिळाली की, एक इसम मोपेड गाडीच्या डिक्कीत अवैधरित्या गांजाची वाहतुक करीत आहे. सदर मोपेड घेवुन आरोपी बायपास चौकातुन मोहपा रोडकडे येत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मोहपा रोड ड्रिम सिटी कडे जाणाऱ्या रोडवर नाकाबंदी केली असता संशयीत मोपेड मो.सा. क्रमाक एम.एच ४० बी.एक्स ७८०१ मिळुन आली. नमुद मोपेड चालकाला ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **सचिन छत्रपती बावणे, वय ३० वर्ष ,रा. जोगीठाणा पेठ, उमरेड असे सांगितले.** पोलीसांनी पंचासमक्ष त्याच्या मोपेड मो.सा. क्रंमाक एम.एच ४० बी.एक्स ७८०१ ची झडती घेतली असता त्यात गांजा मिळुन आला. पोलीसांनी एकुण **२ किलो गांजा किंमती २२,०००/– रूपये आणि** मोपेड मो.सा. क्रमाक एम.एच ४० बी.एक्स. ७८०१ किंमती ३०,०००/– रूपये **असा एकुण किंमती ५२,०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**आरोपी सचिन छत्रपती बावणे, वय ३० वर्ष ,रा. जोगीठाणा पेठ, उमरेड याचे विरुध्द पोस्टे उमरेड येथे येथे कलम २२,२२,२९ एन.डी.पी.एस ॲक्ट १९८५ अन्वये गुन्हा नोंदविण्याची प्रक्रीया सुरू आहे.**




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद कुही पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन कुही**:— दिनांक २२/०४/२०२५ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदार मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कुही पोलीसांनी मौजा चिपडी शिवार येथे नाकाबंदी केली असता एक विनाक्रमांकाचा लाल रंगाचा ट्रॅक्टर ट्रॉलीसहीत मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता त्यात रेती होती. चालक आरोपी **नामे** किरण मनोहर नान्हे,वय ३१ वर्षे,रा.वार्ड क्र. ०६ मांढळ,ता.कुही हा मिळुन आल्याने त्याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच सदर वाहन मालकाचे नाव विचारले असता **वाहन मालक** परमानंद श्रीरामजी कडव,वय ४५ वर्षे,रा.कटारा, ता. कुही याच्या सांगण्यावरून चालकाने अवैध रित्या रेतीची चोरटी वाहतुक केली अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष

**१)** एक विनाक्रमांकाचा लाल रंगाचा ट्रॅक्टर वा त्याला जोडुन असलेली ट्रॉली **आणि त्यामधुन १ ब्रास रेती असा असा एकुण ५,०५,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नमुद वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोस्टे कुही येथे कलम ३०३(२) भा. न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या देशी,विदेशी, मोहाफुल दारू बाळगणा—या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई
## ९ आरोपीविरूध्द गुन्हे नोंद एकुण १०,९४५/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक २२/०४/२०२५** रोजी दारूबंदी कायदाअंतर्गत विविध पोलीस स्टेशन कुही, उमरेड ,पारशिवणी, खापा, कळमेश्वर, आणि नरखेड अश्या पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू, विदेशी दारू असा एकुण १०,९४५/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ९ आरोपीतांवर ९ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने